प्राणवायू, रेमडेसिविरच्या वापरात वाढ

वाढत्या करोना रुग्णसंख्येचा परिणाम

लोकसत्ता खास प्रतिनिधी

औरंगाबाद: शहरातील रुग्णसंख्येने आता हजाराहून दीड हजारी उडी घेतली असून आतापर्यंत १ हजार ३८८ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या आठ हजार ५७० जणांवर उपचार सुरू असून गेल्या काही दिवसांतील प्राणवायूची मागणी आता वाढू लागली आहे. मात्र, सप्टेंबर २०२० मध्ये सर्वाधिक २४ केएल मागणीच्या तुलनेत ती सध्या कमी आहे. सध्या २१ मेट्रीक टन प्रतिदिन प्राणवायू लागत असून कोविड रुग्णालय वाढत असून त्यांना साठा करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात प्राणवायूची रुग्णांसाठी मात्रा हाती येण्यासाठी आणखी तीन चार दिवस लागू शकतील असे सांगण्यात येत आहे. औरंगाबाद शहरात कोविडवर उपचार करणाऱ्या ४५ रुग्णांमधून लागणारा ऑक्सिजन साठा तसेच रेमडेसिविर इंजेक्शनच्या साठ्यावर आता विशेष लक्ष ठेवले जात आहे. आठवडाभरा रेमडेसिविर वापराचे प्रमाण मात्र दुपटीवर गेले आहे. काही रुग्णालये या इंजेक्शनचा नाहक वापरही करत असल्याच्या तक्रारी आहेत. चाचण्यांचे प्रमाण आणि रुग्णसंख्या लक्षात घेता गृहविलगीकरणात उपचारावर भर दिला जात आहे. येत्या दोन दिवसांत ऑक्सिजनचे प्रमाण २१ मेट्रीक टनापर्यंत जाईल असा अंदाज असून तसे नियोजन केले जात आहे.

सहविकृती असणाऱ्या रुग्णांबरोबरच केवळ करोनामुळे मृत्यू पावणाऱ्यांची संख्याही वाढू लागली आहे. सहा मार्चपासून करोना रुग्णसंख्या वाढण्यास प्रारंभ झाला. करोना रुग्णांची संख्या ४४० हून १५५७ पर्यंत वाढत गेली आहे. त्यामुळे खाटांच्या सुविधा वाढविण्यावर भर देण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्यामुळे कोविड काळजी केंद्राची संख्या वाढविण्याबरोबरच मनुष्यबळ वाढविण्याचे कामही वेगात हाती घेण्यात येत असले तरी त्याला मर्यादा पडत असल्याचे वैद्यकीय अधिकारीही मान्य करतात. दरम्यान करोना रुग्णालयातील रेमडेसिविरच्या वापरावर निगराणी ठेवण्यात येत आहे.

प्रतिदिन ५५० ची रेमडेसिविरचा वापर आता प्रतिदिन १ हजार ३०० पर्यंत गेला आहे. या इंजेक्शनची किंमतही प्रशासनाकडून १ हजार ४०० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. सरकारी रुग्णालयात १११४ तर खासगी रुग्णालयात ३३०१ इंजेक्शन असल्याचे सूत्रांनी सांगितले.

रुग्णांसाठी पुरवठा होणारा प्राणवायूचा साठा आणि वापर

जिल्ह्याचे नाव	रुग्णालय संख्या	मिळणारा प्राणवायू	प्राणवायू वापर
औरंगाबाद	४५	२६.५४	२१.७९०
जालना	१२	२.२	३.४
परभणी/ हिंगोली	११	२८.२१	२.०९
नांदेड	५	२.१	२.०६
उस्मानाबाद	१०	१.९६	२.१००
लातूर	२२	८.३००	८.१००
बीड	१०	४.००	३.८००

प्राणवायूचा साठा कमी पडणार नाही अशी तजवीज केली जात आहे. सर्व पुरवठादारांना त्यांच्याकडील साठा वाढविण्याबरोबरच रुग्णालयांनाही द्रवरुप ऑक्सिजन टाक्या भरून घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मागणी नोंदवून पुरवठा सुरू आहे. सप्टेंबरमध्ये लागणाऱ्या सर्वोच्च मागणीपर्यंत पुरवठ्याची गरज लागली नाही. पण कोणीही पुरवठ्याच्या बाबतीमध्ये गाफिल नाही. निगराणी ठेवली जात आहे.

संजय काळे, सहसंचालक औषधे

नांदेडमध्ये ६९७ रुग्ण, ५ मृत्यू

नांदेड जिल्ह्यात शुक्रवारी दिवसभरात ६९७ करोनाचे रुग्ण आढळून आले. आजपर्यंतची दिवसभरातील सर्वोच्च संख्या नोंदली गेली. शुक्रवारी दिवसभरात ५ जणांचा करोनाने मृत्यू झाला. मागील तेरा दिवसात जिल्ह्यात साडे पाच हजारांवर रुग्ण आढळून आले असून या कालावधीत २६ जणांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात ७ मार्चपासून रुग्णसंख्येचा आलेख वाढत आहे. मात्र,त्यानंतरही नागरिकांचे रस्त्यांवरून फिरणे सुरूच आहे.

आरोप-प्रत्यारोपापेक्षा पर्याय खुले ठेवण्यावर भर

परभणी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत दोन्ही बाजूंनी सावध पवित्रे

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मतदान अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना रिंगणात असलेल्या दोन्ही पॅनेलकडून अत्यंत सावध पवित्रा घेतला जात आहे. निवडणुकीनंतर कोण कोणाशी हात मिळवणी करील आणि कोण कोणाच्या तंबूत जाईल, याबाबतची खात्री नसल्याने एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा समीकरणांची जुळवाजुळव करण्यातच दोन्ही बाजूंनी सर्व शक्यतांचे पर्याय खुले ठेवले जात आहेत.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी पुरस्कृत पॅनेलपासून वेगळे होत माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्यासोबत जाण्याचा निर्णय आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी घेतल्यानंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत चुरस वाढली असून सहकारातील निवडणुका या पक्षविरहित असतात, अशी भूमिका आमदार बाबाजानी यांनी मांडली आहे. आमदार वरपूडकर यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलपासून वेगळे होण्याचा निर्णय का घेतला याबाबतही त्यांनी तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे.

परभणी-हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांत माळी व धनगर-हटकर समाज मोठ्या संख्येने आहे, हे दोन्ही समाज शेतीशी संबंधित असणारे आहेत. त्यामुळे या बँकेवर ओबीसीतील मोठा समाज असलेल्या माळी व धनगर समाजाला प्रतिनिधित्व मिळावे, अशी आमची प्रामुख्याने मागणी होती.

पॅनेलमध्ये दोन्ही समाजाला स्थान न मिळाल्याने वेगळे होण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे स्पष्टीकरण आमदार बाबाजानी यांनी पत्रकार बैठकीत दिले. जिल्हा मध्यवर्ती बँक म्हणजे सहकार क्षेत्राचा एक अविभाज्य घटक आहे आणि सहकार क्षेत्रात पक्षाच्या चिन्हांवर निवडणूक होत नाही, त्यामुळे या निवडणुकीत पक्षाचा संबंध नाही. राज्यात अनेक ठिकाणी सहकार क्षेत्रातील पक्षविरहित निवडणुका होतात आणि वेगवेगळ्या पक्षाचे कार्यकर्ते एकत्रित होऊन निवडणूक लढवतात, असेही आमदार बाबाजानी या वेळी म्हणाले.

आमदार बाबाजानी यांनी बोर्डीकर यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने निवडणुकीत नवे रंग भरले आहेत. दोन्ही जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या निवडणुकीत दोन्ही पॅनेलच्या वतीने आपापले उमेदवार निवडून आणण्याच्या दृष्टीने शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. श्री. बोर्डीकर, बाबाजानी, पंडितराव चोखट, आमदार तानाजी मुटकुळे, भगवान सानप, बालाजी देसाई, साहेबराव पाटील गोरेगावकर यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला असून अन्य मतदार संघात चुरशीच्या लढती सुरू आहेत.

वटाणे यांचा मायंदळे यांना पाठिंबा

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर गटाकडून उमेदवारी मिळालेले 'आई तुळजाभवानी शेतकरी विकास पॅनेल'चे उमेदवार भगवानराव वटाणे यांनी दत्तराव मायंदळे यांना पाठिंबा दिला आहे. श्री. वटाणे हे जिंतूर तालुक्यातील वझुर (बु.) च्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विमुक्त जाती भटक्या जमाती या राखीव मतदार संघातील उमेदवार आहेत. आ. बाबाजानी दुर्राणी यांचे समर्थक असलेल्या दत्तराव मायंदळे यांना बँकेचे हित लक्षात घेऊन आपण हा पाठिंबा देत असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. भगवानराव वटाणे यांनी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, विजयराव वरपुडकर, आनंद भरोसे यांच्या उपस्थितीत आपला पाठिंबा दत्तराव मायंदळे यांना घोषित केला.

शिवसेना उपतालुकाप्रमुखाची आत्महत्या; ठाण्यात जमाव

लोकसत्ता प्रतिनिधी

औरंगाबाद : औरंगाबाद पश्चिमचे उपतालुका प्रमुख तथा दौलताबाद ग्रामपंचायतीचे सदस्य सुनील प्रकाश खजिनदार यांनी विवाहित मैत्रिणीच्या घरात गळफास लावून गुरुवारी सायंकाळी आत्महत्या केली. त्यांच्या मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त करून मृतदेह ताब्यात घेण्यास नकार देत शुक्रवारी सकाळी खुलताबाद पोलीस ठाण्यात नातेवाइकांचा जमाव एकत्र आला होता. नातेवाइकांची समजूत घालून मृतदेह ताब्यात देण्यात आला असून या प्रकरणी संबंधित महिलेविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात येत असल्याची माहिती दौलताबादच्या पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांनी दिली.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार सुनील खजिनदार यांचे लग्न ठरले होते. मात्र, त्यांचे गावातीलच विवाहित मैत्रिणीच्या घरी जाणे-येणे होते. गुरुवारीही ते त्या मैत्रिणीच्या घरी गेले होते. तेथेच त्यांच्यात सुनील खजिनदार यांचे लग्न ठरल्याच्या कार्यावरून वाद झाला. या वादातूनच खजिनदार यांनी सायंकाळच्या सुमारास मैत्रिणीच्या घरात गळफास लावला. त्याची माहिती कळताच पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांच्या ताफ्याने जाऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवला. मात्र, शुक्रवारी सकाळी मृतदेह ताब्यात घेण्यास मृत खजिनदार यांच्या नातेवाइकांनी नकार दिला. सुमारे ५० पेक्षाही अधिकच्या संख्येने जमाव दौलताबाद पोलीस ठाण्यात एकत्र आला होता. संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जमावाने केली. अखेर नातेवाइकांची समजूत घालून मृतदेह त्यांच्याकडे दिल्यानंतर सायंकाळपर्यंत सुनील खजिनदार यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल होत असल्याचे पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांनी सांगितले.

शिक्षण विभागाला टाळे ठोकले

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांतर्गत जिल्हा परिषद कन्या शाळा व बहुविध प्रशालेकडे असलेल्या मालमत्ता कराची थकबाकी भरण्यास शिक्षण विभागाकडून टाळाटाळ होत असल्याने हिंगोली पालिकेने शुक्रवारी सायंकाळी शिक्षणाधिकाऱ्यांच्या समक्ष शिक्षण विभागास टाळे (सील) लावले. त्यामुळे शिक्षण विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे.

पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे, अभियंता रत्नाकर अडशिरे, श्याम माळवटकर, बाळू बांगर, पंडित मस्के, मालवणकर यांच्या पथकाने मालमत्ता कराची वसुली मोहीम सुरू केली आहे.

पालिकेच्या पथकाने मागील पंधरवड्यात जिल्हा परिषद कन्या शाळा व जिल्हा परिषद बहुविध प्रशाला या दोन शाळांना मालमत्ता कराच्या १३ लाख रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी सील ठोकले होते. त्यानंतर संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी याबाबत शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांच्याकडे लेखी माहिती देऊन त्याची प्रत पालिकेला दिली होती. मात्र त्यानंतरही शिक्षण विभागाने कर भरण्याबाबत कुठल्याही प्रकारच्या हालचाली केल्या नाहीत.

या पथकाने शुक्रवारी शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांची भेट घेऊन मालमत्ता कराबाबत विचारणा केली. मात्र सोनटक्के यांनी सध्या तरतूद नाही, अशी उत्तरे दिली. त्यामुळे पालिकेच्या पथकाने शिक्षण विभागालाच सील ठोकले आहे.

लातूरमध्ये करोनाचा आकडा वाढताच...

लोकसत्ता वार्ताहर

लातूर : करोनाचा संसर्ग वेगाने वाढत असून दररोज करोनाच्या आकड्यामध्ये मोठी वाढ होत आहे. गुरुवारी सायंकाळी आलेल्या अहवालात एकाच दिवसात तब्बल २९१ नव्या रुग्णांची भर पडली. गेल्या चार महिन्यांतील हा सर्वांत मोठा आकडा आहे. आतापर्यंत जिल्ह्यात २७ हजार ४३३ एकूण करोनाबाधितांची संख्या असून त्यातील २५ हजार २३२ रुग्ण बरे झाले आहेत. एक हजार ४८३ जणांवर उपचार सुरू आहेत. आतापर्यंत ७१८ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. गुरुवारी एक हजार १७२ जणांची आरटीपीसीआर चाचणी करण्यात आली. त्यात ११६ रुग्ण आढळले तर दोन हजार ६४ जणांची रॅपिड ॲंटिजेन टेस्ट करण्यात आली. त्यात १७५ जण नवे रुग्ण आढळले. दोन्ही चाचण्या मिळून २९१ आकडा एका दिवसात झाला आहे. उपचार सुरू असणाऱ्या १११ जणांना गुरुवारी घरी जाण्यास परवानगी देण्यात आली.

जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी ७०० दिवसांवर पोहोचला होता. तो आता खाली घसरत २५४ दिवसांवर आला आहे. गेल्या आठवडाभरात जिल्ह्यात तब्बल एक हजार ३२८ नवे रुग्ण आढळले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रारंभी रात्री ११ ते ५ अशी संचारबंदी लागू केली. त्यानंतर रात्री आठ ते सकाळी पाच वाजेपर्यंत संचारबंदीचे आदेश आहेत. मात्र, याचा करोनाच्या कमी होण्याबाबत कसलाच परिणाम होत नसल्याचे दिसते आहे.

विनामास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे प्रमाण अतिशय अल्प आहे. करोनावर उपचार आहेत व हा बरा होणारा आजार असल्याची भावना लोकांमध्ये रुजल्याने व त्यातही मोफत उपचार शासकीय रुग्णालयात होत असल्याने लोक काळजी करेनासे झाल्याचे दिसते आहे. शासनाच्या वतीने महानगरपालिका, नगरपालिका व पोलीस यांच्या समन्वयाने विनामास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्या, तरी त्याची म्हणावी तशी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसते आहे.

जिल्हा बँकेतील डावपेचात हरिभाऊ बागडे लक्ष्य

लोकसत्ता खास प्रतिनिधी

औरंगाबाद : जिल्हा बँकेतील शेतकरी विकास पॅनलची बांधणी करताना हरिभाऊ बागडे यांच्यावर टीका होत असली तरी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अध्यक्षपदाचे उमेदवार नितीन पाटील हे अपात्र ठरतील आणि मग राज्यमंत्री अब्दुल सत्तार बँक ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करतील, असे राजकारण शिजविले जात आहे. स्वत:च्या गुंत्यात नितीन पाटील अडकल्याची माहिती असणारे नेते म्हणून हरिभाऊ बागडे आणि अब्दुल सत्तार या नेत्यांनी खेळ मांडला असून त्यात शिवसेनेचे इतर नेते अडकले आहेत. सहकारी क्षेत्रात दूध उत्पादक संघ, साखर कारखाना आणि देवगिरी बँक चालविणाऱ्या हरिभाऊ बागडे दूध संघांची अनामत रक्कम जिल्हा बँकेतून काढली. बँकेची काळजी होती तर ही रक्कम काढून का घेतली, असा सवाल माजी आमदार कल्याण काळे यांनी केला आहे. जिल्हा बँकेत शिवसेना मंत्र्यांसह बांधणी केलेले पॅनल भाजपच्या नेत्यांसह केल्यामुळे शिवसेना माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार सुभाष झांबड यांनीही टीका केली आहे.

स्वत: सभासद असणाऱ्या थकबाकीची रक्कम निर्लेखित केल्याचे प्रकरण अद्याप संपलेले नाही. हे प्रकरण सुरू असल्याने अध्यक्षपदाचे दावेदार असणारे नितीन पाटील अपात्र ठरतील आणि त्यानंतर होणारी व्यूहरचनाही आखली जात आहे. एका बाजूला राजकीय पटलावर सोंगट्या कशा फिरवायच्या याचे नियोजन केले जात असताना शिवसेनेतील गटबाजीही पुढे आली आहे. शिवसेना नेत्याला मंत्री आणि जिल्हा प्रमुख विचारतच नाहीत, असा आरोप माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केल्यामुळे जिल्हा बँकेतील ' महाविकास आघाडी'चा प्रयोग आमच्याशिवाय कसा, असा विचार करणारे आमदार सुभाष झांबड, दामोदर मानकापे ही मंडळी माजी आमदार कल्याण काळे यांच्या बाजूने झुकले आहेत. दरम्यान सहकार क्षेत्रात योगदान देणाऱ्या बागडे यांच्यावर आरोप केले जात आहेत. शेतकरी विकास पॅनलच्या बांधण्यात हरिभाऊ बागडे यांनी राष्ट्रवादीचे आमदार सतीश चव्हाण यांनी यावे यासाठी खासे प्रयत्न केल्याचे सूत्राने सांगितले. येत्या दोन दिवसांत होणाऱ्या मतदानावर या घडामोडीचा किती परिणाम होतो हे कळणार असले तरी राजकीय वातावरण मात्र नव्याने तापले आहे.

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, **मे.फोनिक्स इंजिनिअरींग** तर्फे भागीदार **१)श्री.संजय सिताराम अग्रवाल, २) सौ.रितू अजय अग्रवाल, ३)सौ.निलीमा संजय अग्रवाल** यांचे मालकी व ताब्यातील **प्लॉट क्र.एम-४४, वाळुज औद्योगिक वसाहत, रांजणगांव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद, क्षेत्रफळ ५७० चौ.मी.** ज्याची चतु:सिमा.

पुर्वेस : प्लॉट क्र.एम-४५ **पश्चिमेस**: प्लॉट क्र.एम-४३ **दक्षिणेस**: एम.आय.डी.सी. रोड **उत्तरेस** : प्लॉट क्र.एम-३१

सदरील मिळकतीच्या पुर्वीच्या व्यवहारातील म्हणजेच एम.आय.डी.सी. यांनी श्री.हनुमंत बन्सी हाके व सौ.प्रनोती बन्सी हाके भागीदार मे.एच.एम.केमीकल्स यांचे हक्कात करून दिलेले नोंदणीकृत लिज डीड क्र.१४४/९४ दि.२८/०१/१९९४ हे दस्त गहाळ झालेले आहे. सदरील बाबत पोलिस स्टेशन, एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद येथे दि.२२/०२/२०२१ रोजी तक्रार दिलेली आहे. सदरील मालमत्ता ही मे.फोनिक्स इंजिनिअरींग तर्फे भागीदार १)श्री.संजय सिताराम अग्रवाल, २) सौ.रितू अजय अग्रवाल, ३)सौ.निलीमा संजय अग्रवाल यांनी बँक ऑफ बडोदा यांना तारण देवू केलेली आहे.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सूचीत करण्यात येते की, उपरोक्त मूळ कागदपत्रे कोण्यास सापडल्यास ते खालील पत्त्यावर देण्याचे करावे, तसेच उपरोक्त कागदपत्रांचा कोणत्याही प्रकारचा गैरवापर केलेला आढळून आल्यास संबंधीत व्यक्तिना कायदेशीर कार्यवाहीस तोंड द्यावे लागेल, तसेच सदरहू मिळकत कोणाकडे गहाण, दान किंवा त्यावर कोणाचाही, कसलाही बोजा, हक्क, संबंध किंवा सदरहू मिळकतीच्या तारणाबद्दल काहीही आक्षेप असल्यास सर्व संबंधीत कागदपत्रांसह आमच्या कार्यालयात या जाहीर प्रगटनापासून **सात (७)** दिवसांच्या आत दाखल करावा. मुदतीनंतर सदरहू मिळकतीबद्दल कोणताही आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही, कळावे.

मार्फत दि. १९/०३/२०२१

ॲड. आनंद प्र. उमरीकर

७१, 'अभ्युदय', सहकारनगर, नवीन एस.बी.एच.कॉलनी, सहानुरवाडी, औरंगाबाद ☎ 2328696, 9850197594

• जाहीर आक्षेपाचा खुलासा •

ॲड.बि.एम.बादाडे यांनी त्यांचे पक्षकार **नामे बाळकृष्ण कोंडिबा वानखेडे** यांचे मार्फत आमचे पक्षकार **बँक ऑफ महाराष्ट्र** यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी दैनिक लोकसत्ता वृत्तमानपत्रात दिलेल्या स्थावर मालमत्ता विक्रीच्या सुचनेस (नोटीस) जाहीर आक्षेप दिनांक ०५/०२/२०२१ रोजी दैनिक लोकमत वृत्तमानपत्राद्वारे नोंदविलेला आहे. सदरील जाहीर आक्षेपाचा खुलासा.

असे की, आमचे पक्षकार **बँक ऑफ महाराष्ट्र, अस्ती वसुली शाखा फोर्ट मुंबई** यांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रांनुसार स्थावर मालमत्ता **घर क्र.३१, स.क्र.४/पी, सेक्टर एल, एन-११, हडको, यादवनगर, औरंगाबाद प्लॉट चे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. व घर बांधकाम (बिल्टअप) क्षेत्रफळ २६८.१६ चौ.मी.** सदरील नमुद स्थावर मालमत्ता ही दिनांक १८/१२/२०१२ रोजी **चंद्रकला कोंडिबा वानखेडे व संजय कोंडिबा वानखेडे** यांनी आमचे पक्षकार बँक ऑफ महाराष्ट्र यांचे नावे नोंदणीकृत गहाणखत क्र.६२६८/२०१२ द्वारे रू.२ कोटी करिता गहाण केलेली आहे. **मे.राजेंद्र केरोसीन, प्रोप्रा. संजय कोंडिबा वानखेडे व** जामीनदार **चंद्रकला कोंडिबा वानखेडे** यांनी आमच्या पक्षकारामार्फत घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे आमचे पक्षकार – बँक यांनी त्यांचे विरूद्ध मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे सदरील स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेणेसाठी अर्ज नं.२९/२०१५ रोखीकरण व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम २००२ चे कलम १४ नुसार अर्ज करून त्यावर मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी प्रत्यक्ष ताबा देण्याकरिता न्याय निर्णय/आदेशित केले असता त्यावर मे.तहसिलदार औरंगाबाद यांनी संबंधीतास नोटीस बजावून व कायदेशीररित्या पुढील कार्यवाही करून दिनांक ०९/०३/२०२० रोजी सर्व पंचासमोर सदरील स्थावर मालमत्तेचा ताबा व मालकी करून दिली.

असे की, **विजय कोंडिबा वानखेडे, बाळकृष्ण कोंडिबा वानखेडे व उज्वला संजय मोरे** यांनी मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर औरंगाबाद यांचे न्यायालयात दिनांक १९/१२/२०१९ रोजी विशेष दिवाणी दावा क्र.९/२०२०, सौ.चंद्रकला कोंडिबा वानखेडे, राजेंद्र कोंडिबा वानखेडे, संजय कोंडिबा वानखेडे व दिपमाला सुदर्शन म्हात्रे यांचे विरूद्ध जाणून-बुजून व संगनमताने वाटणी व स्वतंत्र ताबा तसेच कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला. दिनांक ०४/१२/२०२० रोजी मा.न्यायालय औरंगाबाद यांनी सदरील दिवाणी दाव्यात न्यायनिर्णय दिला, परंतू मा.न्यायालयाची दिशाभूल करून सदरील स्थावर मालमत्ता ही आमचे पक्षकार बँक ऑफ महाराष्ट्र यांचे कडे कर्जास गहाण ठेवलेली असल्याचे दाव्यात नमुद केलेले नाही व स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्षात ताबा घेते वेळेस सौ.उज्वला संजय मोरे व इतर नातेवाईक हे उपस्थित होते. तसेच सदरील दिवाणी दाव्यात आमचे पक्षकार (बँक ऑफ महाराष्ट्र) यांना प्रतिवादी म्हणून जाणून-बुजून मा.न्यायालयाची दिशाभूल करून सामील केलेले नाही. सदरील स्थावर मालमत्ता दिनांक ०९/०३/२०२० रोजी पासून आमचे पक्षकार (बँक ऑफ महाराष्ट्र) यांचे मालकी व ताब्यात आहे. दिनांक १९/१२/२०१९ रोजी ॲड.बी.ए.बादाडे यांचे पक्षकार व इतर ॲड.श्री.एस.एस.रणदिवे मार्फत सदरील दावा दाखल केलेला आहे. सदरील दावा दाखल करते वेळेस सदरील स्थावर मालमत्ता ही आमचे पक्षकार-बँक यांचेकडे कर्जास गहाण होती व त्यावर ताब्याची प्रक्रिया सुरू झालेली होती व दिनांक ०९/०३/२०२० पासून सदरील स्थावर मालमत्ता ही आमचे पक्षकार-बँक ही यांची कायदेशीररित्या मालकी व ताबा आहे, तसेच तत्पुर्वी संजय किसन मोरे म्हणजेच सौ.उज्वला संजय मोरे यांचे पती यांनी दिनांक १९/१०/२०१९ रोजी ॲड.एस.एस.रणदिवे यांच्या मार्फत दिवाणी दावा क्र.९४५/२०१९ हा मा.दिवाणी न्यायालय औरंगाबाद येथे सौ.चंद्रकला कोंडिबा वानखेडे व विजय कोंडिबा वानखेडे व आमचे पक्षकार बँक ऑफ महाराष्ट्र यांचे विरूद्ध मनाई हुकूमाकरिता दावा दाखल केला असता तो दिनांक ०५/०२/२०२० रोजी खारिज करण्यात आला. सदरील बाबी सुद्धा आपल्या पक्षकारांनी जाणून-बुजून व दिशाभूल करून न्यायनिर्णय मिळविला आहे. त्यामुळे १) विजय कोंडिबा वानखेडे, २) बाळकृष्ण कोंडिबा वानखेडे, ३) उज्वला संजय मोरे हे सदरील स्थावर मालमत्तेत १/७ हिस्सा मिळण्याचा अथवा जाहीर होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व तसा अधिकार सांगता येत नाही व सदरील स्थावर मालमत्तेवर आमचे पक्षकार-बँक यांची मालकी व ताबा असून त्यावर आपला कसलाही हक्क सांगता येणार नाही व तसेच न्यायोचित होणार नाही, म्हणून आपण केलेले दावे व त्यावरील निर्णय आमच्या पक्षकारास त्या स्थावर मालमत्तेसाठी कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

असे की, आमचे पक्षकार (बँक ऑफ महाराष्ट्र) यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी दैनिक लोकसत्ता या वृत्तमानपत्राद्वारे सदरील मालमत्तेच्या विक्रीचे जाहीर प्रगटन/सूचना ही बेकायदेशीर नसून ते योग्यच आहे. सदरील स्थावर मालमत्तेची पुढील विक्री प्रक्रिया ही यापुढेही कायदेशीररित्या चालू राहील.

करिता जाहीर आक्षेपाचा खुलासा.

दिनांक : ११/०३/२०२१

मार्फत
ॲड.देवानंद वाय.नांदेडकर, ॲडव्होकेट हायकोर्ट
प्लॉट नं.२९, फ्लॅट नं.६, 'मालती कॉम्प्लेक्स', रोशन हाऊसिंग सोसायटी, विशालनगर, औरंगाबाद. मो.: ९८९०३८५३६२, ७५८८०८७४५०

HDFC

स्पेशल ऑपरेशन डिपार्टमेंट, बी विंग, चौथा मजला, पेनिन्सुला बिझीनेस पार्क, गणपत राव कदम मार्ग, लोवर परेल (प.) मुंबई 400 013.

विक्रीसाठी जाहीर सूचना

SARFAESI अधिनियम, २००२ अंतर्गत अचल मालमत्तांची "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे तत्त्वावर विक्री

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (SARFAESI अधिनियम, २००२) मधील अनु. १३(२) अंतर्गत दि. ४.११.२०१५ रोजी सूचना पाठविल्यानंतर एचडीएफसी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी एचडीएफसी बँक लि. च्या सुरक्षित कर्जाच्या वसुलीसाठी SARFAESI अधिनियम, २००२ मधील तरतुदींतर्गत दि. ४.०७.२०१७ रोजी ताबा घेतला आणि खाली नमूद स्तंभामध्ये नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेच्या खरेदीसाठी एचडीएफसी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून मोहरबंद लिफाफ्यांमधील प्रस्ताव "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" तत्त्वावर आमंत्रित आहेत.

संपत्तीचा विवरण

कर्जदार / जमानतदार / गहाणदाराचे नाव आणि थकबाकी रक्कम	संपत्तीचे विवरण सोबत राखीव किंमत आणि बयाणा रक्कम जमा (ईएमडी)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ आणि संपत्तीचा लिलाव
१) मेसर्स के जी ॲग्रो प्रोसेसर प्राइवेट लिमी. (कर्जदार) २) श्री राजेष किसनलाल अग्रवाल (संचालक/जमानतदार) ३) श्री सर्वेष राजेष अग्रवाल (संचालक/जमानतदार) ४) श्री नारायण मिश्रीलाल डायमा (संचालक/जमानतदार) ५) श्री सुनिल कन्हैयालाल डायमा (संचालक/जमानतदार) देय : रु. १४,१६,३६,९१७.७७ (रुपये चौदा कोटी सोळा लक्ष छत्तीस हजार नऊशे सतरा आणि सत्त्याल्तर पैसे फक्त) पुढील व्याजासह ०२.०१.२०१६ रोजी @१८% ०३.०१.२०१६ पासून पूर्ण आणि अंतिम देयकाच्या तारखेपर्यंत.	कमर्शिअल अचल संपत्ती सर्वे नं.१५ सिटीएस नं. ३३७६ क्षेत्रफळ १ हेक्टर ५४ एकर वरखाडे स्थित, तालुका शिरपुर, जिल्हा धुळे, महाराष्ट्र – ४२५४०५, सोबत त्यावरील प्लान्ट आणि मशिनरी स्थित. राखीव किंमत :– रु. ९,५०,००,०००/– ईएमडी :– रु. ९५,००,०००/–	निरीक्षण :– २५/०३/२०२१ दु. २:३० ते सायं. ५.०० वाजे पर्यंत. लिलाव :– १२/०४/२०२१ दु. ३.०० रोजी धुळे शाखा येथे

एचडीएफसी बँक लि. कडे असलेल्या माहितीप्रमाणे सदर मालमत्तेवर मालमत्ता कर, सोसायटीची थकबाकी इ. सारखे बोजे, थकबाकी नाही, परंतु, कोणत्याही प्रकारच्या थकबाकीसाठी/बोज्यांसाठी/कराची थकबाकी इ. असल्यास त्यासाठी बँक जबाबदार नसेल. निविदाकार/संभाव्य खरेदीदारांना त्यांचे स्वत:चे हित लक्षात घेऊन अशी सूचना करण्यात येते की त्यांनी निविदा सादर करण्यापूर्वी वर नमूद मालमत्तेशी संबंधित तपशिलाच्या संदर्भात स्वत:चे समाधान करून घ्यावे. येथे नमूद तपशील बँकेकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून कोणतीही चूक झाल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी बँक उत्तरदायी नसेल.

अटी व शर्ती

१.विक्री ही संपूर्णपणे सदर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या आणि विहित निविदा प्रपत्रातील विक्रीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. निविदा प्रपत्र आणि विक्रीच्या अटी व शर्तींची प्रत एचडीएफसी बँक लि. च्या २०७९, मुंदडा मार्केट, ६ गल्ली, पारोळा रोड, धुळे – ४२४ ००१, महाराष्ट्र येथील शाखेतून मालमत्तेच्या पाहणीच्या दिनांकापासून ते २२ मार्च, २०२१ पर्यंत कामकाजाच्या वेळेत प्राप्त करता येईल आण